**डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध**
गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार
**दि.१७ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत. स.१० ते २ दु.**
संपर्क :- **डॉ.गौतम शाह** M.S. (ऑर्थो) शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३)
भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३१४ ■ सोमवार १७ ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26

**PREMIUM QUALITY FOOD IN DHULE**
* Dosas * Sandwiches * Pav Bhaji * Pulao * Frankie
* Pizza * Fries * Chopsuey / Noodles * Momos
* Soup * Punjabi / Chinese / Continental * Starters
* Sizzler * Tandoor Starters * Chaap * Thali
Main Course * Juices * Falooda / Milkshakes / Dessert
JAIN FOOD AVAILABLE FREE HOME DELIVERY
SPACE FOR KITTY / BIRTHDAY PARTY
B'Live Delightful delicacies!
**B'Live Restaurant** Also available on zomato SWIGGY
Below Card House, Lane No.5, Near Sonya Maruti, Dhule
9423928900 / 9307868768


## जरांगेंचा एकोणतीस पासून अंतरवालीत निर्णायक लढा कुणबी प्रमाण, नियुक्ती पत्रांसह विविध प्रश्नांचा इशारा



**अंतरवाली सराटी, दि.१६ : मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून मनोज जरांगे-पाटील यांनी पुन्हा एकदा आंदोलनाची हाक दिली आहे. विविध समाजघटकांवर अन्याय होत असल्याचा आरोप करत त्यांनी एकोणतीस ऑगस्ट पासून अंतरवाली सराटी येथे मोठ्या संख्येने एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. सरकारला अठ्ठावीस ऑगस्टपर्यंतचा वेळ देण्यात आला असून, त्यानंतर पुढील रणनीती ठरवण्यात येईल, असे जरांगे यांनी स्पष्ट केले.**

सरकारने धनगर, मायक्रो ओबीसी, बंजारा, आदिवासी तसेच दलित आणि मुस्लिम समाजावर अन्याय केल्याचा आरोप जरांगे यांनी केला. समाजामध्ये निर्माण झालेली खदखद बाहेर काढण्यासाठी २९ ऑगस्टला अंतरवाली सराटीत पुन्हा एकदा एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले.

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि संजय शिरसाट यांच्यावर टीका करताना जरांगे यांनी मराठा समाजावर अन्याय होत असल्याचा आरोप केला. जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयतक होत असून, हा अन्याय मोडून काढण्यासाठी मराठा समाजाने एकजूट होण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. मराठा समाजातील कुणबी नोंदी आणि प्रमाणपत्रांच्या प्रश्नावर जरांगे यांनी आक्रमक भूमिका घेतली. मराठा समाजातील एकाही व्यक्तीचे कुणबी प्रमाणपत्र रद्द होऊ देणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ज्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत, मात्र अधिकाऱ्यांकडून प्रमाणपत्रे दिली जात नाहीत, ज्यांना प्रमाणपत्र मिळाले आहे पण जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यात अडचणी येत आहेत, तसेच कुणबी कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना वैधता प्रमाणपत्राअभावी अडचणींचा सामना करावा लागत आहे, अशा सर्वांनी २९ (पान ४ वर)



## मोदींच्या हस्ते ध्वजारोहण प्रथमच वंदे मातरम् गायन

नवी दिल्ली, दि. १६ : स्वातंत्र्य दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लाल किल्ल्यावर ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी लाल किल्ल्यावरील राष्ट्रीय कार्यक्रमात प्रथमच वंदे मातरम् गीताचे औपचारिक गायन करण्यात आले. यंदा या राष्ट्रीय गीताला दीडशे वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.ध्वजारोहणापूर्वी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ (पान ४ वर)

## अक्कलपाडा पूर्ण भरण्यासाठी एकशे अठ्ठावन्न हेक्टर जमीन संपादन प्रस्तावास चालना : पालकमंत्री रावल

**धुळे, दि. १६ (प्रतिनिधी) : शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधारस्तंभ असून शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या पहिल्या टप्प्यात धुळे जिल्ह्यातील नऊ हजार वीस शेतकऱ्यांच्या खात्यात ८९ कोटी ७४ लाख हजार रुपये वर्ग करण्यात आले आहेत. अक्कलपाडा धरण शंभर टक्के भरण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यासाठी धरण क्षेत्रातील दहा गावांमधील १९८ हेक्टर जमिन संपादनाच्या प्रस्तावास**



**चालना देण्यात येत आहे, अशी जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिली. स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या मुख्य ध्वजारोहण सोहळ्यात ते बोलत होते. प्रारंभी पोलिस दलाच्या पथकाने पालकमंत्र्यांना मानवंदना दिली.**

स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात ध्वजवंदनाचा मुख्य कार्यक्रम झाला. यावेळी खासदार शोभा बच्छाव, आमदार मंजुळा गावित, आमदार राघवेंद्र पाटील, आमदार अनुप अग्रवाल, महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्स्ना पाटील, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, (पान ४ वर)

## सत्तेचाळीस कोटी खर्चाच्या नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाचे मंत्री रावल यांच्या हस्ते भूमीपुजन



**धुळे, दि. १६ (प्रतिनिधी) : स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून धुळ्यातील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रस्तावित इमारतीचा भूमिपूजन सोहळा पार पडला. स्वातंत्र्य दिनी सकाळी प्रशासकीय संकुलाच्या आवारात जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते संपन्न झाला. नवीन इमारतीच्या उभारणीवर ४६ कोटी ९८ लाख रूपये खर्च होणार आहेत. यावेळी यावेळी खासदार डॉ. शोर्भा बच्छाव, आमदार राघवेंद्र पाटील, आमदार अनुप अग्रवाल, महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्सना पाटील, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.**

धुळ्यातील प्रशासकीय संकुलाच्या आवारात असलेल्या जमिनीवर जिल्हाधिकारी कार्यालयासाठी नवीन इमारत उभारण्यात येणार आहे. त्याचे भूमिपूजन सोहळा स्वातंत्र्यदिनी पालकमंत्री (पान ४ वर)



## शहादा आगारात पाच अत्याधुनिक बस आमदार पाडवी यांच्या हस्ते लोकार्पण

**शहादा,दि१६ (का.प्र.)- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून शहादा आगाराला उपलब्ध झालेल्या ५ अत्याधुनिक जिजाऊ बसेसचा लोकार्पण सोहळा भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून शहादा-तळोदा विधानसभेचे आमदार राजेश पाडवी यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला.**

या नवीन बसेसमुळे शहादा तालुक्यातील ग्रामीण भागातील प्रवासी व विद्यार्थ्यांची गेल्या अनेक महिन्यांपासून होणारी वाहतुकीची गैरसोय (पान ४ वर)

## महापालिकेच्या कारभारात डिजिटल तंत्रज्ञान कमांड अ‍ॅन्ड कंट्रोल सेंटरचे लोकार्पण संपन्न

धुळे, दि. १६- स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून धुळे महानगरपालिकेच्या वतीने शहराच्या विकासात आणि नागरी सुविधांमध्ये नवी क्रांती घडवून आणली आहे. महानगरपालिकेच्या कारभाराला आता पूर्णपणे डिजिटल तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली आहे. कमांड अँड कंट्रोल सेंटर, ऑनलाइन नागरी सुविधा केंद्र, हायटेक विवाह नोंदणी कार्यालय आणि शाळकरी मुलींसाठी सायकल बँक, अशा विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा भव्य शुभारंभ करण्यात आला. जिल्ह्याचे पालकमंत्री



जयकुमार रावल यांच्या प्रमुख उपस्थितीत या सर्व उपक्रमांचे लोकार्पण करण्यात आले. या प्रसंगी धुळ्याच्या महापौर मायादेवी परदेशी, मनपा आयुक्त नितीन कापडणीस, आमदार अनुप अग्रवाल, आमदार राम भदाणे यांच्यासह मनपाचे सर्व नगरसेवक, पदाधिकारी, अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कमांड अँड कंट्रोल या उपक्रमांतर्गत शहरातील दैनंदिन कचरा संकलन, पाणीपुरवठा आणि नागरी तक्रारींवर आता या केंद्रातून थेट ऑनलाइन मॉनिटरिंग केले जाईल. (पान ४ वर)

## मुकटी येथे घरफोडी करणाऱ्या चौघांना एलसीबीकडून अटक; मुद्देमाल जप्त



**धुळे, दि.१६- मुकटी (ता. धुळे) येथे घरफोडी करून सोने-चांदीचे दागिने चोरणाऱ्या तसेच मोटारसायकल चोरी करणाऱ्या टोळीचा धुळे तालुका पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी जळगाव येथील चौघांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून ४९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

मुकटी (ता. जि. धुळे) येथे सहा ऑगस्ट रोजी (पान ४ वर)

## आ. अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते पटेल शैक्षणिक संकुलात ध्वजारोहण

**शिरपूर दि.१६ (प्रतिनिधी) - शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी शिक्षण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते आर. सी. पटेल शैक्षणिक संकुलाच्या मेन बिल्डिंग येथील प्रांगणात स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी संस्थेचे पदाधिकारी, मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी, पालक या सर्वांनी भारतीय तिरंग्यास सलामी देत मानवंदना दिली. त्यांनतर सामूहिक राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत, ध्वजगीताचे सामूहिक गायन करण्यात आले.**



कार्यक्रम प्रसंगी संस्था अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, खजिनदार बबनलाल अग्रवाल, संचालक अतुल भंडारी, संचालक सीए विजय भंडारी, कमलकिशोर भंडारी, डॉ. अर्जुन पटेल, सीईओ डॉ. उमेश शर्मा, अकॅडमिक इंचार्ज पी. व्ही. पाटील, प्राचार्य एस. जे. पाटील, प्राचार्य डॉ. एस. एन. पाटील, प्र. प्राचार्य डॉ. गजानन पाटील, मुख्याध्यापक प्रदिप गहिवरे, मुख्याध्यापक विवेकानंद ठाकरे, पर्यवेक्षक बी. बी. अग्रवाल, पर्यवेक्षक वाय. व्ही. कोठावदे, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी बॅण्ड पथक, स्काऊट पथक या प्रसंगी उपस्थित होते. वंदे मातरम, राष्ट्रगीत, राज्यगीत यांचे सामूहिक गायन करुन राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. भारतीय स्वातंत्र्य ८० व्या दिनाचे औचित्य साधून स्व. रसिकलाल चुनीलाल पटेल उर्फ पप्पाजी पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. ध्वजारोहणानंतर राष्ट्रीय, राज्य, जिल्हा स्तरावर उत्तुंग कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. (पान ४ वर)

## जिल्हा कारागृहाच्या सुधारणेसाठी सर्वतोपरी सहकार्य : मंत्री रावल



**धुळे, दि. १६- ऐतिहासिक आणि अनेक स्वातंत्र्य सैनिकांचे वास्तव्य राहिलेल्या धुळे जिल्हा कारागृहातील सुधारणांसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले. धुळे जिल्हा कारागृहाच्या प्रशासकीय इमारत व प्रवेशद्वार उद्घाटन सोहळा आज संपन्न झाला. त्यावेळी पालकमंत्री श्री. रावल बोलत होते.**

यावेळी आमदार राघवेंद्र पाटील, आमदार (पान ४ वर)

## बस उलटल्याने बार ठार पंतप्रधानांकडून शोक व्यक्त

हंगेरी, दि. १६ : पोलंडची राजधानी हंगेरीमध्ये रविवारी पहाटे भीषण अपघात झाला. हायवेवरून रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात बस कोसळून उलटली. त्यामुळे या दुर्घटनेत बारा जणांचा मृत्यू झाला तसेच अनेक प्रवासी जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी रात्री एकच्या सुमारास हा अपघात झाला. हंगेरी ची राजधानी बुडापेस्ट पासून सुमारे एकशे चाळीस किलोमीटर अंतरावर ही दुर्घटना घडली. या अपघाताबाबत पोलंडच्या पंतप्रधानांनी शोक व्यक्त केला आहे. प्राथमिक तपासात ड्रायव्हरला डुलकी लागल्याने हा अपघात (पान ४ वर)

## धुळे-नंदुरबार जिल्हा शिक्षक पतसंस्थेकडून सभासदांना सात टक्के लाभांश देणार : किशोर शिंदे

**धुळे, दि.१६- सर्व सभासदांच्या विश्वासामुळे पतसंस्थेचे कामकाज होत आहे. वर्षभरात कामकाज करताना सभासदांना सात टक्के लाभांश देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सभासदांनी वेळोवेळी व्यक्त केलेला विश्वास आणि सहकार्यामुळे पतसंस्था प्रगतीच्या वाटेवर आहे. येणाऱ्या काळात सभासदांच्या हितासाठी अनेक महत्वांचे निर्णय घेतले जाणार आहेत. त्यासाठी सर्वांना विश्वासात घेतले जाईल, अशी भावना धुळे-नंदुरबार जिल्हा प्राथमिक, माध्यमिक शिक्षक-शिक्षकेतर सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेचे अध्यक्ष किशोर शिंदे यांनी व्यक्त केली. धुळ्यातील गोंदूररोडवरील शिवसागर मंगल कार्यालयात रविवारी पतसंस्थेची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. यावेळी पदाधिकारी आणि बहुसंख्य सभासद उपस्थित होते.**

धुळे-नंदुरबार जिल्ह्यातील सहकारी वित्तीय संस्थामध्ये धुळे-नंदुरबार जिल्हा शिक्षक-शिक्षकेतर पतसंस्थेचे नाव आदराने घेतले जाते. गेल्या बत्तीस वर्षांपासून पतसंस्थेचा आलेख सतत उंचावत आहे. सभासदांची आर्थिक गरज पूर्ण करताना पतसंस्थेकडून सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देणे, सेवानिवृत्त सभासदांचा गौरव, सभासदांना अडचणीच्यावेळी अल्पावधीत सुलभरितीने पैसे उपलब्ध करून देण्याची भुमिका पतसंस्थेची आहे. त्याचवेळी कर्ज घेतलेल्या सभासदांकडून नियमितपणे परतफेड होत होत असल्याने पतसंस्था प्रगती करीत आहे. आजच्या (पान ४ वर)

## शहाद्यातील सैय्यद उर्दू शाळेत स्वातंत्र्यदिन साजरा

शहादा, दि.१६ (प्रतिनिधी)- येथील सर सैय्यद अहमद खान एजुकेशन सोसायटी संचलित सर सैय्यद ऊर्दू प्रायमरी, ऊर्दू गर्ल्स हायस्कुल अँड ज्यूनियर कॉलेज येथे स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष प्रा.सैय्यद लियाकत अली सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.प्राचार्य सैय्यद इफ्तेखार अली यांच्या हस्ते शाळेला लागून असलेल्या नगरपालिकेच्या प्राथमिक शाळा क्रमांक दोनचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी चित्रकला स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून बक्षिसे मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते (पान ४ वर)


## अमेरिकेतील होप फॉर संस्थेने मनपा इंग्रजी शाळेस प्रोजेक्टर दिले

**धुळे, दि.१६- महापालिकेच्या इंग्रजी माध्यम शाळा क्रमांक नऊ येथे स्वातंत्र्य दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून अमेरिकेतील होप फॉर चाईल्ड या सेवाभावी संस्थेच्या सदस्य सायली छत्रपाल भदाणे होत्या. त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक वाणी, श्रीमती करनकाळ आणि शिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध स्वातंत्र्य सैनिकांच्या वेशभूषेत सहभाग घेत कार्यक्रमाची शोभा वाढवली.**

स्वातंत्र्य दिनानिमित्त झालेल्या या कार्यक्रमात होप फॉर वाईल्ड या संस्थेतर्फे विद्यार्थ्यांच्या डिजिटल शिक्षणासाठी प्रोजेक्टर भेट देण्यात आला. सायली छत्रपाल भदाणे यांच्या हस्ते हा प्रोजेक्टर शाळेकडे सुपूर्द करण्यात आला. होप फॉर चाईल्ड ही अमेरिकेतील इलिनॉय राज्यातील सेवाभावी संस्था आहे. तिची स्थापना अर्णव राहुल जैन या तरुण विद्यार्थ्याने केली आहे. अर्णव जैन यांनी नुकतीच भारत भेट दिली असता, चोवीस जुलैस त्यांनी इंग्रजी माध्यमाच्या शाळा क्रमांक नऊ मधील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप केले होते. यावेळी त्यांनी शाळेच्या विविध गरजांची माहिती घेतली. विद्यार्थ्यांच्या डिजिटल शिक्षणासाठी प्रोजेक्टरची आवश्यकता असल्याचे समजल्यानंतर त्यांनी तो उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने संस्थेच्या वतीने प्रोजेक्टर भेट देऊन हे आश्वासन पूर्ण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी मराठे यांनी केले. नेहा शर्मा यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी मनीषा पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी तेजल चौधरी, राखी काळे, श्रद्धा शिंदे, सक्‍ेहा जगदाळे, सोनम खेले, प्रकाश पाटील, शरद पवार, कृष्णा साळवे, माया भारस्कर, पुजा कापडणीस यांच्यासह शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.

## राज्यस्तरीय आदर्श ग्रा.पंचायत अधिकारी पुरस्कारासाठी हिम्मत वंजारी यांची निवड

**शहादा,दि.१६ (प्रतिनिधी) - ग्राम विकासाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत प्रशासनाच्या माध्यमातून ग्रामीण विकासाला गती देणारे बामखेडा त.त, मोहिदे त.श व शिरुड (ता.शहादा) येथील ग्रामपंचायत अधिकारी हिम्मत रणछोड वंजारी यांची २०२४-२५ च्या राज्य स्तरीय आदर्श ग्राम पंचायत अधिकारी पुरस्कारासाठी नंदुरबार जिल्ह्यातून एकमेव निवड झाली आहे.**



त्यांच्या या निवडीने शहादा तालुका आणि जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. हिम्मत वंजारी हे शहादा तालुकातील बामखेडा त.त, मोहिदे त श व शिरुड या ग्राम पंचायतीच्या कामकाजाची जबाबदारी सांभाळत आहेत. ग्राम पंचायतीच्या माध्यमातून शासनाच्या विविध लोक जनकल्याणकारी योजना तळागाळातील नागरिका पर्यंत पोहचविणे विकासकामांचा सातत्याने पाठपुरावा करणे, ग्रामस्थांच्या समस्या जाणून ते सोडविण्यासाठी पुढाकार घेणे आणि प्रशासन व नागरिक यांच्यात प्रभावी समन्वय निर्माण करण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे. विशेष म्हणजे सन २०२४-२५ या वर्षासाठी राज्य स्तरीय आदर्श ग्राम पंचायत अधिकारी पुरस्कारासाठी नंदुरबार जिल्ह्यातून हिम्मत रणछोड वंजारी यांची एकमेव

**दिपक ज्वेलर्स**
सोने- 22 K -1,38,800 रु.+3% GST
सोने- 24 K -1,51,500 रु.+3% GST
चांदी- 2,35,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## जुने धुळे येथील तरुणाची आत्महत्या

**धुळे, दि.१६- येथील जुने धुळे परिसरातील तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवारी घडली. योगेश संतोष वाघ (मिस्त्री) (वय ३२ रा.गल्ली नं.१४ सुभाषनगर जुने धुळे) असे त्याचे नाव आहे.**

योगेश याने घरच्या स-याला साडीने गळफास घेतला. दुपारी ही घटना निदर्शनास येताच कुटुंबीय, परिसरातील काहींनी धाव घेतली. त्यास खाली उतरविल्यानंतर श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले. तेथील डॉ. वसावे यांनी योगेश वाघ यास मृत घोषीत केले.

## धुळ्यातील अंध शाळेचा उपक्रम तृतीयपंथीयांच्या हस्ते ध्वजारोहण



**धुळे, दि.१६- स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून प्रेरणा बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने शहरातील अंधशाळेतील अंध विद्यार्थ्यांसाठी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना कार्डशीट पेपरसह विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना फळांचेही वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यात आला.**

दरम्यान, काळूबाई मंदिर परिसरात प्रेरणा बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने तृतीयपंथीयांच्या उपस्थितीत ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. संस्थेच्या अध्यक्ष तथा महामंडलेश्वर पार्वती जोगी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रध्वजाला मानवंदना देत उपस्थितांनी देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामातील हुतात्म्यांना अभिवादन केले. या कार्यक्रमाला तृतीयपंथीयांसह एकल महिला, संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी जपत वंचित घटकांसाठी विविध उपक्रम राबविण्याचा संस्थेचा प्रयतक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. (पान ४ वर)

## चोरीचा मुद्देमाल घेणाऱ्यास अटक

लामकानी (ता.धुळे) येथील बोरीस फाट्याजवळ पोलिसांनी संशयित जयपाल नानाभाऊ गिरासे (वय २५ वर्ष, रा. चिमठावळ ता. शिंदखेडा) याची विचारपूस चौकशी केली. त्याच्या ताब्यात जलपरी वीजपंप मिळाला. त्याबाबत जयपाल गिरासे याने कुठलीही माहिती दिली नाही. त्याच्याजवळील वीज पंपाची किंमत साडेचार हजार रुपये असून त्याने तो चोरुन आणला असावा किंवा चोरट्याकडून घेतला असावा अशी पोलिसांना शंका आली त्यामुळे चौकशीसाठी त्याला ताब्यात घेण्यात आले असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

आपला महाराष्ट्र

# फाळणीच्या वेदनांचा स्मृतिदिन : स्वातंत्र्याचे विडंबन

परवा महाराष्ट्रासह देशभरात भारतीय स्वातंत्र्याचा ८० वा वर्धापन दिवस उत्साहात साजरा झाला. त्यानिमित्ताने नऊ ऑगस्ट पासून पंधरा तारखेपर्यंत हर घर तिरंगा ही मोहीम राबविण्यात आली. राज्यकर्त्यांच्या असे लक्षात आले की, घराघरावर तिरंगा लावण्याचे फारसे कोणी मनावर घेत नाही म्हणून मग शासक पक्षाचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरविण्यात आले. त्यांनी मिरवणुका काढल्या आणि राष्ट्रध्वज वाटले. तरीही लोकांनी ते घरावर लावलेच असे मात्र दिसले नाही. तिरंगा रॅलीची प्रसिद्धी भरपूर झाली. मीडियाचा मोठा वर्ग त्यांच्यासोबत असल्यामुळे या प्रसिद्धीला काही तोटा नव्हता. अशाप्रकारे देश कोणताही असो जबरदस्तीने राष्ट्र प्रेमाची भावना रुजवता येत नाही. त्यातल्या त्यात ज्यांना हे स्वातंत्र्यच मान्य नव्हते तसेच तिरंगाही मान्य नव्हता हा इतिहास काही फारसा जुना नाही. अनेकांना तो माहित आहे. त्यामुळे अचानकच दाटून आलेले राष्ट्रप्रेम लोकांनी अनुभवले आहे. असो. तरीही स्वातंत्र्याचे प्रतीक आणि ती भावना मनामनात रुजावी यासाठी असे उपक्रम गरजेचे असतात. म्हणून त्याबद्दल नकारात्मक भूमिका घेण्याचे काही कारण नाही. जो कोणी मनापासून राष्ट्रप्रेम व्यक्त करीत असेल त्याचे स्वागतच केले पाहिजे. मात्र महत्त्वाचा मुद्दा पुढचा आहे. स्वातंत्र्यदिनी राष्ट्रध्वजारोहणाचे, लाल किल्ल्यापासून जिल्ह्या जिल्ह्यात आयोजन होत असताना आदल्या दिवशी म्हणजे १४ ऑगस्ट रोजी देशभर अधिकृतपणे फाळणी दुःख दिवस पाळणे ही भूमिका दोगली वाटते. आपण प्रत्यक्षात असणे आणि पांघरलेला बुरखा वेगळा असणे याच पद्धतीची ही भूमिका आहे. याचा अर्थ असा आहे की, ज्यांना स्वातंत्र्य मान्य नव्हते, स्वातंत्र्याचे आंदोलन मान्य नव्हते, जे ब्रिटिश धार्जिणे होते, महायुद्धात सैन्य भरती करण्याच्या बाजूने होते. ज्यांच्या पैकी कोणीही स्वातंत्र्यलढ्यात अजिबात योगदान दिलेले नाही. अशांना युनियन जॅक खाली उतरवून ज्या तिरंगा ध्वजाचे रोहण होणार होते तो तिरंगाही मान्य नव्हता हीच भूमिका १४ ऑगस्ट च्या फाळणीच्या वेदनांचा स्मृतिदिन पाळण्याच्या भूमिकेमध्ये आहे.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणतात की स्वातंत्र्य जेव्हा मिळाले तेव्हा नरेंद्र मोदी किंवा सरदार वल्लभभाई पटेल पंतप्रधान असते तर देशाचे विभाजनच झाले नसते. लखनऊ मध्ये त्यांनी सांगितले की १९४७ मध्ये पाकिस्तानने मागणी केलेली नसतानाही त्यांना सिंध बंगाली हिंदू बहुल भाग देण्यात आला त्यातही बंगालमधील बंगाली बहुल गावे बंगलादेशसाठी जबरदस्तीने रिकामी करायला लावण्यात आली. सत्तेसाठी अधीर झालेल्या काँग्रेसची ही लज्जास्पद कृती होती. सत्तेत जेवढे आणि जे कोणी असतील तेवढ्यांनी जहरी बोललेच पाहिजे असा नित्य नियम असल्याने दरवर्षी स्वातंत्र्य दिनाच्या संध्याकाळी या पद्धतीने त्यांना बोलावेच लागते. कारण दुसरे काही लोकांना देण्यासाठी नसल्यामुळे काँग्रेस विषयी बोलणे त्यांना भाग आहे. म्हणूनच गेल्या १२–१३ वर्षांपासून संसदेत किंवा संसदेबाहेर नेहरूंना लक्ष केले जाते. त्यासाठीच आपण सत्तेत आहोत असे सांगण्याचा सतत प्रयतक होत असतो. लोकांना हे सगळे ऐकून सहन करावे लागते कारण त्यांच्या हातात काहीच नाही. एकदा खोटे सांगितल्या नंतर पुन्हा पुन्हा तसेच खोटे लोकांना ऐकायला मिळत असेल तर त्यांनाही खरे वाटायला लागते. यास गोबेल्स नीती म्हणतात. हिटलरचा उजवा हात डॉक्टर गोबेल्स याच पद्धतीने खोटे पसरवत असे. हिटलरला तो त्याचे म्हणणे पटवून देत असे. शेवटच्या काळात देखील संयुक्त राष्ट्राच्या फौजा हिटलरच्या खंदकापर्यंत पोहोचलेल्या असताना डॉक्टर गोबेल्स हिटलरला सांगत होता की अमेरिकेचे अध्यक्ष लगेचच मृत्युमुखी पडतील. त्यामुळे संयुक्त राष्ट्राच्या फौजा परत फिरतील आणि मग तुमच्या यशाचा मार्ग मोकळा होईल.. प्रत्यक्षात तसे काही घडले नाही. हिटलरला त्याचा अंत जवळ दिसायला लागला. आणि त्याने आपल्या शेवटच्या प्रवासाची तयारी सुरू केली. स्वत:वर गोळ्या झाडून घेतल्या.

याच पद्धतीचा खोटा प्रचार आणि प्रसार शासक पक्षाचे प्रमुख लोक खालचे आणि वरचे करीत आलेले आहेत. गृहमंत्री जेव्हा म्हणतात की फाळणी हा भारतीय इतिहासातील भयानक क्रौर्याचा अध्याय असून त्या जखमांचे व्रण ही काँग्रेसने देशवासीयांना दिलेली भेट आहे आणि इतिहास ते कधीच विसरणार नाही. वास्तविक १४ ऑगस्ट हा दिवस फाळणी वेदना स्मृतिदिन म्हणून पाळण्याचे काहीच कारण नव्हते. आपला पराक्रम काहीच नसल्यामुळे त्यासंबंधीची चर्चा होऊ देणे टाळण्यासाठी हा नवा फंडा उपस्थित करण्यात आलेला आहे हे उघड आहे. खरे तर फाळणीच्या काळात आपसातील बेदिली मुळे भारतातील आणि नव्या पाकिस्तानातील हजारो लोक मृत्युमुखी पडले. त्या जखमा त्या काळातील राज्यकर्त्यांना देखील असह्य होत होत्या ते काही भावना हिन नव्हते. पण त्यांच्याही हातात काही नव्हते. मुळात शेवटच्या व्हाईसरॉयने इंग्रजांच्या धोरणा नुसार फाळणीचा घाट घातला होता. महात्मा गांधी आणि काँग्रेसचे वरिष्ठ नेते यांचा फाळणीला प्रचंड विरोध होता. मात्र काँग्रेस मधून बाहेर पडलेले बॅरिस्टर जीना यांनी वेगळ्या पाकिस्तानची मागणी केली होती. त्या मागणी वरती ते अडून बसले होते. त्यांना देश सोडून जाणाऱ्या ब्रिटिशांचे पाठबळ होते. त्यामुळे फाळणी अटळ होती. महात्मा गांधी यांना ही फाळणी मान्य नव्हती. जर फाळणी होत असेल तर माझ्या प्रेताहून तुम्हाला जावे लागेल असे त्यांनी म्हटले होते. जेव्हा फाळणीच्या मुद्द्यावर एकमत झाले किंवा करावे लागले तेव्हा महात्मा गांधी राजधानी दिल्लीत न थांबता जिकडे दंगे भडकले होते त्या भागात म्हणजे नौआखलीत शांतता प्रस्थापित करण्यासाठी निघून गेले होते. कोणाची हिम्मत त्यांच्यासोबत जाण्याची नव्हती. ते एकटेच आणि त्यांची नात सोबत होती अतिशय भीती दायक वातावरणात ते बाहेर पडले. त्याचा परिणाम असा झाला की एक एक करून सुमारे चारशे कार्यकर्ते त्यांच्यासोबत चालत गेले. तिकडे १४ ऑगस्टच्या रात्री पाकिस्तान मध्ये स्वातंत्र्य दिन घोषित झाला. मात्र त्यांनी कधी फाळणीचा वेदना स्मृतिदिन साजरा केलेला नाही. त्या देशातही अनेक लोक मृत्युमुखी पडले होते. त्यांनाही त्याचे दुःख होते. मग इकडे आपल्याकडे इतके वर्षानंतर म्हणजे ७९ वर्षानंतर त्या जखमा आपल्या राज्यकर्त्यांना दिसू लागल्या आहेत त्यामुळे त्यांना स्मृतिदिन पाळण्याची दुर्बुद्धी सुचली. म्हणजेच दुसऱ्या दिवशीचा सकाळचा स्वातंत्र्य दिवस ते नाईलाजाने साजरा करीत आहेत.

एकीकडे अशा प्रकारे नाईलाजाने स्वातंत्र्य दिवस साजरा करायचा, दुसरीकडे आदल्या दिवशी फाळणीच्या वेदनांचा स्मृती दिवस पाळायचा, त्यानिमित्ताने जहरी मते व्यक्त करायची, लोकांची दिशाभूल करायची. देशाच्या सर्वोच्च सभागृहात विरोधी पक्षांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना सामोरे जाण्याची हिंमत नाही म्हणून तिकडे जायचेच नाही. उत्तरही द्यायचे नाही. कारण ते देणे अवघड आणि अशक्य असल्यामुळे वास्तवाला सामोरे जायचे नाही. एकीकडे अशी भूमिका तर दुसरीकडे आपल्या अधिपत्याखाली असलेल्या प्रसारमाध्यमांकडे फाळणीचे दुःख व्यक्त करायचे. काँग्रेसवर खापर फोडायचे आणि आपला कंडू शमवून घ्यायचा अशी दुहेरी भूमिका दुसरीकडे. यालाच सध्याचे राजकारण म्हणतात. खरे तर फाळणीचे दोषी फक्त दोघे होते. एक बॅरिस्टर जीना आणि दुसरे विनायक दामोदर सावरकर होत. जीऔना यांनी फार उशिरा सहा वर्षे लंडनमध्ये राहून भारतात परत आल्यानंतर द्वि राष्ट्रवादाची भूमिका मांडली होती. त्यावर ते अडून बसलेले होते. परंतु सावरकरांनी त्यांच्या आधी ही भूमिका मांडली होती. तिचा पुनरुचार केला होता. त्यांच्या पक्ष संघटनेत तसा ठराव केला होता. काँग्रेसने फाळणीची कुठेही मागणी केलेली नाही.फाळणीचा प्रस्ताव व्हाईसरॉयचा होता आणि त्याने जीना यांना फूस दिली होती. सावरकर आधीपासूनच त्या मताचे होते. परिणामी फाळणीचे पातक हे काँग्रेसच्या डोक्यावरचे नसून या तिघांचे होते. परंतु इतिहासाचा विपर्यास करून नव्याने खोट्या पद्धतीने त्याची मांडणी करण्याचे उद्योग सध्या देशात सुरू आहेत. मात्र असे असले तरी शासक पक्षा कडून सतत वापरावयाचे हे शस्त्र आता बोथट झालेले दिसते. जेन झीच्या जंतर–मंतर वरील आंदोलनाच्या निमित्ताने ही बाब स्पष्ट झालेली आहे. ही पिढी आता खोटा इतिहास सहन करून घेणार नाही. ती काही ऐकणार नाही. त्यामुळे शासन कर्ते हादरून गेलेले आहेत. बचावात्मक भूमिका म्हणून अशा प्रकारचे वेदनेचे स्मृति दिवस पाळण्याची वेळ त्यांच्यावर आलेली आहे. कालाय तस्मै नमः.




## स्वातंत्र्य दिनानिमित्त अनरद येथील शिबिरात २१ रक्तदात्यांचे रक्तदान

**शहादा, दि.१६ (प्रतिनिधी)- तालुक्यातील अनरद येथे स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून माळी समाज भवन येथे रक्तदान शिबिर संपन्न झाले. यात २१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. देशासाठी रक्तदान, देशासाठी योगदान या संदेशातून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत रक्तदान केले. रक्तदान हे श्रेष्ठ दान असून एका रक्तदात्यामुळे गरजू रुग्णांचे प्राण वाचण्यास मदत होऊ शकते या भावनेने सदरचे रक्तदान शिबिर यशस्वी पार पडले.**

या रक्तदान शिबिराचे आयोजन सावता फाउंडेशनचे अध्यक्ष राजेंद्र भाईदास माळी तसेच समस्त ग्रामस्थ मंडळी, अनरद यांच्यावतीने करण्यात आले होते. यावेळी रक्तदात्यांना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक भेटवस्तू देण्यात आली. स्वातंत्र्य दिन रक्तदान करून साजरा करण्याचे आवाहन सावता फाउंडेशनचे अध्यक्ष तथा युवा नेते राजेंद्र भाईदास माळी यांनी नागरिकांना केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत या सामाजिक उपक्रमात नागरिकांनी सहभाग घेतला. यावेळी सुरेश माळी, अण्णा कोळी, विनोद माळी, अमोल माळी, पुनम माळी, गंगाधर माळी, नरेंद्र माळी, नवल माळी, मुन्ना माळी, तुषार पाटील, मनोज वाघ, उमेश माळी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## भाजप एस.टी. मोर्चाच्या अध्यक्षपदी कविता सोनवणे



धुळे, दि.१६- भारतीय जनता पक्षाच्या धुळे महानगर जिल्हा अनुसूचित जमाती (एस.टी.) मोर्चाच्या अध्यक्षपदी नगरसेविका कविता शरद सोनवणे (कोळी) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार भारती पवार यांच्या हस्ते कविता सोनवणे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

भाजपा धुळे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र महादेव अंपळकर यांच्या अध्यक्षतेखाली ही नियुक्ती करण्यात आली. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, पणन मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, संघटन मंत्री रवि अनासपुरे, धुळे शहराचे आमदार अनुप अग्रवाल, माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे व माजी आमदार कुणाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया पार पडली.नगरसेविका कविता सोनवणे यांच्या अनुभव, कार्यतत्परता आणि संघटन कौशल्याचा विचार करून पक्षाची ध्येय-धोरणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासह संघटना अधिक मजबूत करण्याची महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

या नियुक्तीबद्दल नगरसेविका कविता सोनवणे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

प्रकाश में आज शक सस्पेन्स मुवी




विनोद खन्ना शबाना आजमी उत्पल दत्त बिंदु

## सी.गो.पाटील महाविद्यालयात ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा

साक्री, दि.१३- विद्या विकास मंडळाचे सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री येथे भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस.आर. रंगनाथन यांची वी जयंती तसेच राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी ग्रंथालयाचे बदलत्या डिजिटल युगातील महत्त्व, वाचनसंस्कृती आणि विद्यार्थ्यांनी उपलब्ध ज्ञानस्रोतांचा प्रभावी वापर करण्याची गरज यावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनंत पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. आर.आर. अहिरे उपस्थित होते. व्यासपीठावर आयक्यूएसी समन्वयक डॉ. डी.एस. चव्हाण, डॉ. चंद्रकांत कढरे व डॉ. डी. पी. पाटील उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.



धुळे शह्यातील काँग्रेस भवनात स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजवंदन झाले. त्यावेळी उपस्थित खासदार डॉ.शोभा बच्छाव, साबीर शेख, युवराज करनकाळ, अलोक रघुवंशी, अमीन पटेल, रमेश श्रीखंडे, डॉ.अनिल पाटील, प्रताप महाले, प्रमोद सिसोदे, जयपालसिंग सिसोदीया, राजेंद्र खैरनार

## स्वा.विवेकानंद इंग्लिश मीडि. स्कूलमध्ये नशामुक्तीची शपथ

दोंडाईचा, दि.१४- नशेच्या वाढत्या विळख्यातून समाजाला मुक्त करण्यासाठी जनजागृतीची गरज असताना दोंडाईचा शहरात नशामुक्त भारत अभियान उत्साहात राबविण्यात आले. शनिवार, दि. ऑगस्ट रोजी स्वामी विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी नशामुक्तीची शपथ घेतली. नशेपासून दूर राहण्यासोबतच समाजात नशामुक्तीचा संदेश पोहोचविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

स्वामी विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूल आणि प्रजापिता ब्रह्मकुमारीज विश्वविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून राबविण्यात येत असलेल्या नशामुक्त भारत अभियान अंतर्गत कोटी नशामुक्ती प्रतिज्ञा महाअभियानाचा प्रारंभ दोंडाईचा शहरातून स्वामी विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूल येथे करण्यात आला.

### जाहीर नोटीस — नि. ६

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनी. डिव्ही. यांचे कोर्टात**

दि. कि. अर्ज नं. ७७६/२०२६

**१) पिंजारीबाई गुंजाऱ्या पावरा, २) हेमराज गुंजाऱ्या पावरा, ३) शिवाजी गुंजाऱ्या पावरा, ४) इंदुबाई किसन पावरा**
सर्व रा.चिंचपाणी ता. शिरपूर जि.धुळे ... **अर्जदार**

**॥ विरुद्ध ॥**

**कोणीही नाही ... जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार पिंजारीबाई गुंजाऱ्या पावरा वगैरे यांनी मे. न्यायालयात नामे गुंजाऱ्या गणशा पावरा हे दि. २८/१२/२००८ रोजी मौजे चिंचपाणी ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे गुंजाऱ्या गणशा पावरा यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत / तक्रार असल्यास दि. १७/९/२०२६ रोजी ठिक १०.३० वाजता मे.न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आदेशावरुन

सही... **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे (कोर्टाचा शिक्का) सही... **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

### जाहीर नोटीस — नि. ६

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. (ज्यु. डि.) यांचे कोर्टात**

दि. कि. अर्ज नं. ७७४/२०२६

**१) जगदीश मोहन परदेशी २) ललिता सरदार बेडवळ ३) संगिताबाई मोहन परदेशी**
सर्व रा.हिसाळे ता. शिरपूर जि.धुळे ... **अर्जदार**

**॥ विरुद्ध ॥**

**कोणीही नाही ... जाबदेणार**

ज्याअर्थी मयत मोहन दगडू परदेशी हे दि. २९/०८/१९९४ रोजी व मयत यशोदाबाई मोहन परदेशी ह्या दि. ०४/०१/२०२४ रोजी मौजे हिसाळे ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले असून आता अर्जदार नं.१ ते ३ यांना शासकीय व निमशासकीय कामांसाठी व अर्जदारहेच दोन्ही मयतांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. १७/०९/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दि. ०३/०८ /२०२६

सही... **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे (कोर्टाचा शिक्का) सही... **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

### जाहीर नोटीस — नि.२७

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनी. डिव्ही. यांचे कोर्टात**

दि. कि. अर्ज नं. २३५/२०२६

**१) नेपालसिंग किसनसिंग राजपुत, २) मंगलसिंग किसनसिंग राजपुत (मयत) २अ) मिनाबाई मंगलसिंग राजपुत २ब) विपुल मंगलसिंग गिरासे (राजपुत) २क)राजपाल मंगसिंग राजपुत ३) प्रमिलाबाई नामदेव राजपुत, ४) चंद्रकोर कल्याणसिंग जाधव ५) उर्मिलाबाई धनसिंग राजपुत,**
सर्व रा. अहिल्यापूर ता. शिरपूर जि.धुळे ... **अर्जदार**

**॥ विरुद्ध ॥**

**कोणीही नाही ... जाबदेणार**

X

**किसनसिंग प्रतापसिंग गिरासे (राजपुत)** मृत्यू दि. २९/०३/२००३
रा. अहिल्यापूर ता. शिरपूर जि. धुळे ... **मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. शिरपूर न्यायालयात मयत नामे किसनसिंग प्रतापसिंग गिरासे (राजपुत) हे दि. २९/०३/२००३ रोजी रा. अहिल्यापूर ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाल्यामुळे अर्जदार यांना औपचारिक कारणासाठी वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास त्यांनी दि. ११/९/२०२६ रोजी ठिकसकाळी १०.३० वा. स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरून सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दि. ११/८/२०२६ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

सही... **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर (कोर्टाचा शिक्का) सही... **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर

### जाहीर नोटीस — नि. ६

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनी. डिव्ही. यांचे कोर्टात**

दि. कि. अर्ज नं. ७७२/२०२६

**१) रमेश माणकलाल ओसवाल, २) किशोर माणकलाल ओसवाल, ३) प्रभावती फुलचंद राका (मयत) ३अ) फुलचंद चुनिलाल राका ३ब) स्वाती संतोष भंडारी, ३क) लिना संदिप बंब ३ड) प्रिया विशाल रायसोनी, ३इ) शितल फुलचंद राका ३ई) दिपीका फुलचंद राका, ४) पुष्पा पोपटलाल धाडीवाल**
सर्व रा. प्लॉट नं. १० आदर्श नगर शिरपूर जि.धुळे ... **अर्जदार**

**॥ विरुद्ध ॥**

**कोणीही नाही ... जाबदेणार**

X

**माणकलाल गणेशराज ओसवाल** मृत्यू दि. ०१/०३/१९९४
रा. प्लॉट नं. १०, आदर्श नगर, शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे ... **मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. शिरपूर न्यायालयात मयत नामे माणकलाल गणेशराज ओसवाल हे दि. ०१/०३/१९९४ रोजी मौजे रा. प्लॉट नं. १०, आदर्श नगर, शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाल्यामुळे अर्जदार यांना औपचारिक कारणासाठी वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास यांनी दि. १७/९/२०२६ रोजी ठिक १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काही एकहरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दि. ११/८/२०२६ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

सही... **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर (कोर्टाचा शिक्का) सही... **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर

### शब्दकोडे क्रमांक : २४३३




**आडवे शब्द :** १.समूह २.लढाई ४.योग्य व्यक्तीची केलेली पसंती ७.अलमारी ८.रात्री आकाशात चमकणारा ग्रह ९.लेखणी ११.संभाषण ११.मनोज कुमार यांचा एक देशभक्तीपर आधारित सिनेमा १३.अवस्था १४.अग्नी १५.करड्या रंगाची १७.मेघ १८.नाश २१.चोरी करणारा २३.आपण राहतो ते घर, ती इमारत २४.हिंदीत आश्चर्य २६.फुलातील पराग कण २७.मुद्दा २८.हिंदीत -कमी ३०.कौरवांचे पिता धृतराष्ट्राचा सचिव ३१.महान ३२.स्वस्त-विरुद्ध ३४.बागकाम करणारा ३५.बारा वर्षांचा काळ ३६.पती ३८.मृत्यू ४१.हिंदीत-प्रियकर ४२. झोपडी ४३.शुद्ध ४४.सेविका दुधापासून बनवले ४५. मध्य रेल्वेतील एक स्थानक ४७.झोपडी दुधापासून बनवतात तो पदार्थ ४९.अधःपतन ५०.रद्द

**उभे शब्द :** १.लोखंडी सळी २.वृत्तपत्राचे संपादन करणारा ३.वाढ-विरुद्ध ४.कुठलाही आकार नसलेला ५.इंग्रजीत-बदक ६.मुलायम ७.ग्रामीण बोलीत -केव्हा ८.ज्वर १०.सान ११.सोबत १२.झेप १४.आम्ही सर्व मिळून तयार होणारा शब्द २६.दोरी १७.लखनऊ येथील जमीनदार व प्रतिष्ठित व्यक्ती २०.पचण्यास हलके असलेले २१.पक्षाच्या तोंडावर असणारे अणुकूचीदार अवयव २२.अजय देवगन,तब्बू यांचा एक सिनेमा २५. लीन २६.चांदी २६.पायपुसणे २८.मोठा ३२.मज ३३.मराठी भाषेतील वर्ण अक्षरे मुळाक्षरे ३७. एखाद्यास केलेली आरडाओरडी ३९.युद्ध ४०.ऐतवार ४१.पूर्ण बाह्यांचा अंगरखा ४३.पलायन ४५.मेहनत ४६.शह

**शब्दकोडे क्रमांक : २४३२ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हो | मु | झ | | चु | | श | ह | र | | वी | स |
| ळी | | ब | द्री | ना | थ | | मी | | का | ट | |
| | शो | ले | | व | रा | त | | शौ | र्य | | पा |
| बा | क | | मी | | र | | भा | न | | पा | त |
| य | | को | | को | क | म | | क | रं | ग | ळी |
| को | प | र | ख | ळी | | हा | नी | | ग | ल | |
| | द | स | रा | | जा | ग | र | ण | | खा | र |
| घो | र | | ब | द | ल | | ज | | अ | ना | थ |
| ळ | | वि | | री | | सां | | स्व | स्त | | स |
| | न | का | र | | अ | ज | ग | र | | त | ह्र |
| था | | स | | पो | ट | | री | | न | व | मी |
| प | र | क | र | | क | टी | ब | दध | | स | |

TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI
DOLBY DIGITAL PLUS




ता. १५ से रोज २ खेल टा. १२,९बजे
आवारापन-2 (हिंदी)
book my show
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI
DOLBY DIGITAL PLUS




ता. १५ से रोज २ खेल टा. ३,६बजे
बटवारा-1947 (हिंदी)
book my show
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

## पान १ वरुन

### नियुक्ती पत्रांसह विविध प्रश्नांचा इशारा

ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटीत उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

ईडब्ल्यूएस आणि एसईबीसी प्रवर्गातून निवड होऊनही अद्याप नियुक्तीपत्रे न मिळालेल्या उमेदवारांनीही आपले अर्ज घेऊन अंतरवालीत यावे, असे जरांगे यांनी सांगितले. तसेच सारथी आणि अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळांतर्गत प्रलंबित असलेले व्याज परतावे मिळण्याची मागणी करणाऱ्यांनीही सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. जोपर्यंत नियुक्त्या आणि संबंधित कामे मार्गी लागत नाहीत, तोपर्यंत इथून कुणीही माघारी जायचे नाही, अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी मांडली. दरम्यान, एकोणतीस ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटीत होणाऱ्या या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारकडून कोणती भूमिका घेतली जाते आणि अठ्ठावीस ऑगस्टपर्यंत प्रलंबित प्रश्नांवर कोणते निर्णय होतात, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

### मोदींच्या हस्ते ध्वजारोहण

आणि संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वागत केले. ध्वजारोहणानंतर पंतप्रधान मोदी यांनी देशाला संबोधित करत नागरिकांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी हर घर तिरंगा अभियानाचा उल्लेख केला. आज प्रत्येक हृदयाचे ठोके वंदे मातरम्‌ च्या लयीत धडकत आहेत. आज प्रत्येक घरात तिरंगा आहे आणि प्रत्येक मनात तिरंगा आहे, असे ते म्हणाले. देश नव्या संकल्पांसह प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे सांगत पंतप्रधानांनी महान क्रांतीकारकांना अभिवादन केले. मोठे संकल्प आणि त्यांना पूर्ण करण्याची सामर्थ्यवान इच्छाशक्ती यामुळे देशाची प्रगती शक्य असल्याचे त्यांनी नमूद केले. गेल्या काही वर्षांत संकल्प आणि सामर्थ्याच्या जोरावर देशाने विविध क्षेत्रांत प्रगती केली असल्याचेही पंतप्रधानांनी सांगितले. देशाच्या विकासासाठी नागरिकांनी मोठी उद्दिष्टे ठेवून त्यासाठी एकजुटीने प्रयतक करण्याचे आवाहन त्यांनी केले. दरम्यान, वंदे मातरम्‌ या राष्ट्रीय गीताच्या रचनेला यंदा १५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे यंदाच्या स्वातंत्र्य दिनाच्या राष्ट्रीय सोहळ्यात लाल किल्ल्यावर प्रथमच वंदे मातरम्‌ चे औपचारिक गायन होणे हा कार्यक्रमाचा विशेष क्षण ठरला.

### अक्कलपाडा पूर्ण भरण्यासाठी

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, पोलिस अधीक्षक विशाल आनंद, महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस, अतिरिक्त जिल्हाधिकारी संदीप पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, माजी खासदार सुभाष भामरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री रावल म्हणाले की, कर्जमुक्ती योजनेतील उर्वरित पात्र शेतकऱ्यांना दुसऱ्या टप्प्यात लाभ देण्यात येणार आहे. पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करून योजनेचा लाभ घ्यावा. जिल्ह्यात यंदा समाधानकारक पाऊस झाला असून, खरीप हंगामात तीन लाख ६४ हजार हेक्टर क्षेत्रावर विविध पिकांची पेरणी झाली आहे. जलाशयांमध्येही समाधानकारक जलसाठा झाला असला तरी पाण्याची बचत करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी धुळे-नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच राष्ट्रीयीकृत बँकांना पीक कर्ज वितरणाचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यानुसार यंदाच्या खरीप हंगामात जिल्ह्यातील ३१ हजार ९२८ शेतकऱ्यांना ४४८ कोटी रुपयांचे पीक कर्ज वितरित करण्यात आले आहे. सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेचे काम प्रगतीपथावर असून, आतापर्यंत जवळपास टक्के काम पूर्ण झाले आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर धुळे व शिंदखेडा तालुक्यातील हजारो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले. पांझरा नदीवरील अक्कलपाडा प्रकल्प शंभर टक्के भरण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यासाठी साक्री तालुक्यातील दहा गावांतील १९८ हेक्टर जमीन संपादनाचा प्रस्ताव कार्यान्वित झाला असून, भूसंपादन कायद्यानुसार कार्यवाही सुरू असल्याची माहिती मंत्री रावल यांनी यावेळी दिली. ध्वजवंदनानंतर उपस्थित मान्यवरांसह सर्वसामान्य नागरिकांच्या भेटी घेत मंत्री रावल यांनी उपस्थितांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

### नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाचे..

जयकुमार रावल यांच्याहस्ते झाला. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यात सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता विनोद भदाणे, अतिरिक्त जिल्हाधिकारी संदीप पाटील, अतिरिक्त पोलिस अधीक्षक अजय देवरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रवींद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, उपजिल्हाधिकारी किशोर कदम, माजी खासदार सुभाष भामरे आदी उपस्थित होते. प्रस्तावित जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत चार मजली असणार आहे. तळमजल्यावर वाहनतळाची व्यवस्था करण्यात येणार असून, चौथ्या मजल्यावर चारशे आसन क्षमतेचे सुसज्ज सभागृह उभारण्यात येणार आहे. या इमारतीच्या बांधकामासाठी एकूण ४६ कोटी ९८ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. यावेळी पालकमंत्री जयकुमार रावल यांनी प्रस्तावित इमारत आदर्शवत असावी, अशा सूचना केल्या. इमारतीमध्ये नागरिकांसह अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी सर्व अत्याधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. विविध शासकीय कार्यालयांचा समावेश करून राज्यासाठी पथदर्शी ठरेल, अशी प्रशासकीय इमारत साकारावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### शहादा आगारात पाच अत्याधुनिक बस

पूर्णपणे दूर होणार आहे. नवीन जिजाऊ बसेसची प्रमुख वैशिष्ट्ये अशी,आधुनिक तंत्रज्ञान, बीएस सिक्स इंजिन, एअर सस्पेंशन आणि डिजिटल रूट बोर्ड.५५ आसनांची क्षमता, मोबाईल चार्जिंगसाठी पोर्ट्स.प्रवाशांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची यंत्रणा.लोकार्पण सोहळा प्रसंगी बोलताना आमदार पाडवी यांनी सांगितले की, शहादा आगार हे खान्देशात सर्वाधिक उत्पन्न देणाऱ्या अग्रगण्य आगारांपैकी एक आहे. एसटी स्थानक व आगाराच्या विकासासाठी राज्य शासनाकडून सुमारे २८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, पहिल्या टप्प्यातील १४ कोटींच्या कामांना लवकरच गती मिळणार आहे. शहादा बसस्थानकाच्या नवीन ब्लू-प्रिंटला मान्यता मिळाली असून लवकरच प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल.प्रवाशांची गरज ओळखून तोरणमाळ पर्यटन स्थळासाठी १० मिनी बसेस आणि १५ नवीन लालपरी बसेसची मागणी करण्यात आली आहे. कार्यक्रमास उपविभागीय प्रांताधिकारी दीपक गिरासे, तहसीलदार संभाजीराव पाटील, शहादा आगार प्रमुख हरीश भोई, लोकनायक जयप्रकाश नारायण सूतगिरणीचे चेअरमन दीपकभाई पाटील, उपनगराध्यक्षा माधवीताई पाटील, पोलीस निरीक्षक हेमंतकुमार पाटील, बाजार समितीचे माजी सभापती सुनील पाटील, नगरसेवक ज्ञानेश्वर चौधरी, भाजप नेत्या कल्पना पंड्या, प्रवासी संघाचे अध्यक्ष प्रा. दत्ता वाघ, प्रा. रवींद्र पंड्या, अनिल भामरे, ईश्वर पाटील, हेमराज पवार यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मोतीलाल जैन, भाजप शहराध्यक्ष विनोद जैन, नगरसेवक राकेश पाटील आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पटेल शैक्षणिक संकुलात ध्वजारोहण

एकूण ५१२ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, रोख रक्कम, मेडल देऊन गौरविण्यात आले. तसेच संस्थेतील १० वी १२ वी च्या ज्या शाळा व शिक्षक यांनी उत्कृष्ट कामगिरी करून ए.पी.आय. उंचावला त्यांचाही गौरव संस्थेचे अध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते करण्यात आला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अमरीशभाई पटेल यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. सी. शिंपी, सोनाली पाटील, एस. आर. देसले, क्रीडा शिक्षक मनोज पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशवीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचा शेवट वंदे मातरम गीताने झाला.

## पान १ वरुन

### महापालिकेच्या कारभारात डिजिटल तंत्रज्ञान

तक्रार निवारणाच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि वेग येणार आहे. राइट टू सर्व्हिस आणि ऑनलाइन प्रणालीत नागरिकांना घरबसल्या तक्रारी नोंदवता येतील. ऑफलाइन अर्जांचेही डिजिटल ट्रॅकिंग करून अर्जाच्या सद्यस्थितीची माहिती राइट टू सर्व्हिसच्या धर्तीवर नागरिकांना मिळेल. महापालिकेच्या विवाह नोंदणी कार्यालयाचे आधुनिकीकरण करण्यात आले असून, ऑनलाइन वेळ निश्चित करून आल्यावर अवघ्या दहा मिनिटांत लॅमिनेटेड प्रमाणपत्र हातात मिळेल. जन्म-मृत्यू दाखल्यांसाठीही हीच सुविधा लागू केली जात आहे. मुलींसाठी सायकल बँक या उपक्रमात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींचे शिक्षण हे लांब अंतर किंवा वाहतुकीच्या साधनांअभावी सुटू नये, म्हणून ही बँक सुरू करण्यात आली आहे. सध्या आठवी ते बारावीच्या विद्यार्थिनींना, तर पुढील टप्प्यात पाचवी पासूनच्या मुलींना सायकली दिल्या जातील. धुळे महानगरपालिकेने उभारलेली ही डिजिटल यंत्रणा आणि मुलींसाठीची सायकल बँक अत्यंत कौतुकास्पद आहे. पारदर्शकता आणि प्रशासकीय गती वाढवणारा धुळे पॅटर्न महाराष्ट्रातील इतर महानगरपालिकांनीही अभ्यासण्यासारखा आहे, असे मत यावेळी पालकमंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केले.

### मुकटी येथे घरफोडी करणाऱ्या..

मध्यरात्री दीड ते दोन वाजेच्या दरम्यान लक्ष्मण नारायण परदेशी यांच्या घरातून अज्ञात चोरट्यांनी सोने-चांदीचे दागिने चोरून नेले होते. याप्रकरणी धुळे तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे आधुनिक तंत्रज्ञान, सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या माध्यमातून संशयितांचा माग काढला. त्यानुसार तेरा ऑगस्ट रोजी जळगाव येथून अझरुद्दीन सलीम शेख (वय २२, रा. पिंप्राळा हुडको), अबरार ऊर्फ चिरक्या हमीद खाटीक (वय २२, रा. शिवाजीनगर), साजीद नजोद्दीन शेख (वय २१, रा. पिंप्राळा हुडको) आणि समती शेख युसूफ शेख (वय २१, रा. पिंप्राळा, हल्ली मुक्काम विटाभट्टी, देवपूर, धुळे) यांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी सखोल चौकशी केली असता संशयितांनी मुकटी येथील घरफोडीची कबुली दिली. तसेच त्यांनी मोटारसायकल चोरीचा आणखी एक गुन्हा केल्याची माहिती दिली. त्यांच्या ताब्यातून चोवीस हजार रुपये किमतीची तीन भार चांदीची चैन व तीन भार चांदीचे पैजण, तसेच पंचवीस हजार रुपये किमतीची सुझुकी ॲक्सिस मोटारसायकल (क्रमांक एमएच-१८/बीवाय-६६९७) असा एकूण ४९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.या कारवाईमुळे धुळे तालुका पोलिस ठाण्यात दाखल असलेले घरफोडीचा आणि मोटारसायकल चोरीचा, असे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. ही कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक अजय देबरे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक धनंजय पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलिस अंमलदार उमेश पवार, मनोज शिरसाठ, प्रतीक देसले, राजू पावरा आणि संदीप माळी यांच्या पथकाने केली.

### जिल्हा कारागृहाच्या सुधारणेसाठी..

अनुप अग्रवाल, उपमहापौर ज्योत्सना पाटील, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, पोलिस अधीक्षक विशाल आनंद, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता विनोद भदाणे, कार्यकारी अभियंता आर. आर. पाटील, अपर पोलिस अधीक्षक डॉ. अजय देवरे, कारागृह अधीक्षक एकनाथ शिंदे, उप अधीक्षक संदीप एकशिंगे, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे आदी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री रावल यांच्या हस्ते बंदिवानांना स्वातंत्र्य दिनानिमित्त मिठाईचे वाटप करण्यात आले. पालकमंत्री रावल म्हणाले की, या कारागृहात अनेक स्वातंत्र्य सैनिक बंदिवान म्हणून होते. याच कारागृहात आचार्य विनोबा भावे यांनी गीताई सांगितली. जिल्हा कारागृहाच्या सुधारणांसाठी मानवतावादी दृष्टिकोन ठेवला जाईल. कारागृहातील बंदिवानांनी कौशल्य आत्मसात करून स्वावलंबी व्हावे. कारागृहाच्या मुख्य प्रशासकीय इमारत व प्रवेशद्वाराचे उद्घाटन झाले. हा प्रकल्प राज्यातील सुधारित व आधुनिक कारागृह व्यवस्थेच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल आहे. कारागृहातील सुधारणांसाठी राज्य शासनाने तत्परतेने निर्णय घेत १४ कोटी ९९ लाख रुपयांचा निधी मंजूर केला. यामुळे कारागृह व्यवस्थेत आधुनिक सुविधा उपलब्ध झाल्या असून, बंदींच्या पुनर्वसनाला नवी दिशा मिळणार आहे, असेही त्यांनी सांगितले. कारागृह अधीक्षक शिंदे म्हणाले की, धुळे कारागृहाची स्थापना १८६२ मध्ये झाली. या कारागृहात स्वातंत्र्य सैनिक बंदिवान म्हणून होते. या कारागृहात जिल्हा नियोजन समिती व राज्य शासनाच्या माध्यमातून विविध सुविधा निर्माण केल्या जात आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. पाटील यांनी कारागृहात सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सुरू असलेल्या विविध कामांची माहिती दिली. प्रारंभी पालकमंत्री रावल यांनी परिसराची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

### बस उलटल्याने बार ठार

झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. आपघातात दहा जण गंभीर जखमी झाल्याचे सांगण्यात आले आहे. घटनास्थळी मदत आणि बचावकार्य सुरू असून जखमीना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलंडचे पंतप्रधान पीटर मॅग्यार यांनी सोशल मीडियावरून या दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केले. त्यांनी मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करत घटनास्थळी मदत आणि बचावकार्यात सहभागी असलेल्या कर्मचाऱ्यांचे आभार मानले. दरम्यान, पोलंडचे राष्ट्राध्यक्ष कॅरोल नवरोकी आणि परराष्ट्र मंत्री राडोस्लाव सिकोरस्की यांनीही या अपघाताबद्दल शोक व्यक्त केला. पोलिस वाणिज्य दूतावासाची टीम हंगेरीच्या अधिकाऱ्यांच्या सतत संपर्कात असून परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचे त्यांनी सांगितले.

### सभासदांना सात टक्के लाभांश देणार

बत्तीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेत विषयपत्रिकेवरील सर्व विषयांवर साधक-बाधक चर्चा झाल्यानंतर सर्व सभासदांनी बहुमताने विषयांना मंजूरी दिली आहे. त्याबद्दल संपूर्ण संचालक मंडळ सभासदांचे आभारी आहे. सभासदांचा विश्वास कायम दृढ राहिल, यादृष्टीकोनातून पतसंस्थेचा कारभार चालविला जाईल, अशी भावना अध्यक्ष शिंदे यांनी व्यक्त केली. त्याचवेळी सभा संपवितांना त्यांनी गेल्या आर्थिक वर्षातील ताळेबंदाची माहिती देताना सभासदांसाठी सात टक्के लाभांशाची घोषणा केली. लाभांशाची रक्कम लवकरच सभासदांच्या खात्यावर जमा होईल, असेही त्यांनी सांगितले. त्यावेळी उपस्थित सभासदांनी टाळ्यांचा गजर करीत समाधान व्यक्त केले. यावेळी गटनेते दत्तात्र्य शिंदे, यावेळी प्रमुख अतिथी म्हणून संजय लोटन पवार, शिवाजी देवीदास बाविस्कर, पतसंस्थेचे उपाध्यक्ष अमोल पाटील, संचालक यांच्यासह सर्व संचालक उपस्थित होते. पतसंस्थेचे व्यवस्थापक अतुल पाटील यांनी ताळेबंद मांडून विषयपत्रिकेवरील विषयांचे वाचन केले. राष्ट्रगीताने वार्षिक सर्वसाधारण सभेची सांगता झाली.

### उर्दू शाळेत स्वातंत्र्यदिन साजरा

पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. तसेच जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. याशिवाय एलिमेंटरी परीक्षेत यश संपादन करून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाही प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमात संस्थाध्यक्ष प्रा. सैय्यद लियाकत अली, सेक्रेटरी मंजूर हुसेन खान, अब्दुल भाई हासमानी, शमीम बी हकीम कुरेशी, डॉ. शाह खलील सर, मोहम्मद उमर बागबान, सैय्यद अतहर अली सर, प्राचार्य सैय्यद इफ्तेखार अली सर व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक वर्ग उपस्थित होते.

## जातनिहाय जनगणनेत ओबीसींचा स्वतंत्र कॉलम असावा
## सरकारची भूमिका ओबीसी विरोधीच ; विजय वडेट्टीवार

**मुंबई, दि. १६ : मराठा आरक्षण मागणीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील ओबीसी आरक्षणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी ओबीसींच्या प्रश्नावरून राज्य सरकारवर जोरदार टीका करत सरकारची भूमिका ओबीसीविरोधी असल्याचा आरोप केला आहे. जातनिहाय जनगणनेच्या मुद्द्यावर बोलताना वडेट्टीवार यांनी केवळ जनगणनेत जात नोंदविल्याने प्रश्न सुटणार नसल्याचे म्हटले. जातनिहाय नोंदी सोबत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम असणे आवश्यक आहे. तसेच विविध पोटजाती आणि वेगवेगळ्या राज्यांमध्ये जातींची नोंद कोणत्या पद्धतीने केली जाते, याचाही विचार होणे गरजेचे असल्याचे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.**

ओबीसी उपसमितीच्या बैठका नियमित होत नसल्याचा आरोप करत वडेट्टीवार यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सरकार ओबीसींच्या प्रश्नांबाबत अनुकूल नसल्याचे दिसून येत आहे. सरकारची भूमिका ओबीसीविरोधी असल्याचा आरोप त्यांनी केला. ओबीसींच्या प्रश्नांसाठी आंदोलन करणाऱ्यांनी सरकारवर दबाव आणून जातनिहाय नोंदीमध्ये ओबीसींचा स्वतंत्र कॉलम समाविष्ट करण्याची मागणी करावी, असे आवाहनही त्यांनी केले. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाबाबत विचारले असता वडेट्टीवार यांनी या विषयापासून काँग्रेसने अंतर राखले. जरांगे-पाटील काय करतात, कोणाला बोलावतात किंवा कोणत्या बैठका घेतात, हे सरकार आणि जरांगे पाटील पाहतील. काँग्रेसने त्यात पडण्याचे कारण नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली. मात्र, ओबीसी समाजावर अन्याय होत असल्याचा आरोप करत त्यांनी सरकारच्या धोरणांवर टीका कायम ठेवली.



विडा

**ओबीसीला संपवण्याचा विडा**

ओबीसी समाजाच्या वाट्याला काहीच मिळत नाही. ओबीसी समाजावर अन्याय करण्याचा आणि ओबीसीला संपवण्याचा विडा सरकारने उचलल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला. ओबीसी समाजाच्या प्रश्नांकडे सरकार गांभीर्याने पाहत नसल्याचेही ते म्हणाले. ओबीसींच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या उपसमितीचे अध्यक्ष महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आहेत. त्यांनी आतापर्यंत केवळ दोन बैठका घेतल्याचा दावा केला. दर महिन्याला उपसमितीची एक बैठक घेण्यात यावी आणि ओबीसी नेत्यांना त्यात सहभागी करून त्यांच्या समस्या व सूचना मांडण्याची संधी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

**मराठवाड्यात ओबीसी प्रमाणपत्रांवरही प्रश्न**

मराठवाड्यात मोठ्या प्रमाणावर नवीन ओबीसी प्रमाणपत्रे दिली जात असल्याचा दावा वडेट्टीवार यांनी केला. या प्रकरणाकडे ओबीसी समाजाने अधिक जागरूकतेने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, मराठा आरक्षणाच्या मागणीसोबतच ओबीसी आरक्षण, जातनिहाय जनगणना आणि ओबीसी प्रमाणपत्रांचा मुद्दा राज्याच्या राजकारणात पुन्हा चर्चेत आला असून, या विषयावर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

## शाहरुख खान, अजय देवगण, टायगर श्रॉफला
## पानमसाल्याच्या अप्रत्यक्ष जाहिरातीची नोटीस

**मुंबई, दि. १६ : पानमसाल्याचे अप्रत्यक्षपणे प्रमोशन केल्याच्या आरोपावरून महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) बॉलिवूड अभिनेते शाहरुख खान, अजय देवगण आणि टायगर श्रॉफ यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली असून, तिन्ही अभिनेत्यांना नोटीस मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत स्पष्टीकरण सादर करण्यास सांगण्यात आले आहे.**



महाराष्ट्रात पानमसाल्याचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर बंदी आहे. असे असतानाही २०२४ मध्ये तिन्ही अभिनेत्यांनी एका पानमसाला कंपनीच्या उत्पादनाशी संबंधित जाहिरात मोहिमेत एकत्र काम केल्याचे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंडे यांनी अकरा ऑगस्ट रोजी नऊ पानी नोटीस जारी केल्याचे वृत्त आहे. संबंधित जाहिरात मोहिमेतील सहभाग तातडीने थांबवावा तसेच अधिकृत सोशल मीडिया खात्यांवरून जाहिरातीशी संबंधित प्रमोशनल कंटेंट हटवावा, असे निर्देश नोटीसमध्ये देण्यात आले आहेत.

**अप्रत्यक्ष प्रमोशनचा दावा**

प्राथमिक पाहणीत संबंधित जाहिरात ही प्रामुख्याने पानमसाल्याशी जोडलेली असल्याचे आढळून आले आहे. महाराष्ट्रात सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने पानमसाल्याच्या उत्पादनापासून विक्रीपर्यंत विविध बाबींवर बंदी असताना अशा जाहिरातीमुळे ग्राहकांच्या मनात संबंधित प्रतिबंधित ब्रँडची प्रतिमा निर्माण होऊ शकते. त्यामुळे ही जाहिरात अप्रत्यक्षपणे प्रतिबंधित उत्पादनाचे प्रमोशन ठरू शकते, असे प्रशासनाने नोटीसमध्ये नमूद केल्याचे सांगण्यात येत आहे.

**करार, मानधनाची माहिती मागवली**

आयुक्त तुकाराम मुंडे यांनी तिन्ही अभिनेत्यांकडून जाहिरात व एंडॉर्समेंट कराराच्या प्रती, संबंधित मोहिमेची माहिती, मानधनाचे तपशील तसेच जाहिरात स्वीकारण्यापूर्वी करण्यात आलेल्या पडताळणीची कागदपत्रे सादर करण्यास सांगितले आहे. दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींमध्ये सहभाग आढळल्यास ग्राहक संरक्षण कायद्यानुसार दंडात्मक कारवाई होऊ शकते. संबंधित प्रकरणात लाख ते लाख रुपयांपर्यंत दंड तसेच काही परिस्थितीत जाहिरातींमध्ये सहभागी होण्यावर तीन वर्षांपर्यंत बंदी होण्याची तरतूद असल्याचे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे.

## पान १ वरुन

### तृतीयपंथीयांच्या हस्ते ध्वजारोहण

कार्यक्रमास संस्थेचे सचिव निलू जोगी, उपाध्यक्ष स्वराज योगी, अलका जोगी, शुभांगी जोगी, राधा जोगी, नेहा जोगी, जानवी जोगी, रोहिणी जोगी यांच्यासह संस्थेचे इतर पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या उपक्रमातून सामाजिक समता, बंधुभाव आणि वंचित घटकांच्या सक्षमीकरणाचा संदेश देण्यात आला.

**पाहिजेत**
कापड दुकानासाठी
२ -सेल्समन आणि
२ - हेल्पर पाहिजे
-: समक्ष भेटा :-
सोना लेडीज वेअर
किड्स वेअर
पारोळा रोड, धुळे
मो. 9767544005

**जागा भाड्याने देणे आहे**
खोलगल्ली कस्तुरबा गांधी रोड कमल पुस्तकालय समोरील पहिला मजला सर्व सोयींनी युक्त ६२५ स्क्वेअर फुट जागा ऑफिस, डॉक्टर, लॅब यांना भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
9822357707

**पाहिजेत**
अनुभवी स्टाफ भरणे आहे.
१. आर.एम.ओ. (MBBS/BAMS/BHMS/BUMS)- २
२. कॉम्प्युटर ऑपरेटर- २
३. नर्सिंग स्टाफ (सिस्टर/ब्रदर)-४
४. रिसेप्शनिस्ट- २
५. वॉर्डबॉय- २
६. वॉचमन- २
अर्जासह समक्ष
भेटणे वेळ दुपारी १ ते ३
निरायम हॉस्पिटल
व श्वास क्रिटिकल केअर
व सिटी स्कॅन सेंटर, ८० फुट रोड, धुळे

**पाहिजेत**
हुशार व अनुभवी
सेल्स मॅन पाहिजे.
ॲण्ड
अकाऊन्टंट पाहिजे
Tally Oprater
-: संपर्क :-
साईबाबा रेडीमेड ॲण्ड होजीअरी
गल्ली नं. २, मुल्लावाडा रोड, अकबर चौक, धुळे
मो. 9422286958
7350148955

**भाड्याने/विकणे**
शैक्षणिक क्लासेस चालू असलेली, 6000 Sq.feet चांगले बांधकाम असलेली जागा भाड्याने अथवा क्लासेस सहित विकणे आहे.
-: संपर्क :-
8055401841

**पाहिजेत**
यश दाताच्या दवाखान्यात काम करण्यासाठी पुर्णवेळ/अर्धवेळ कंपाउंडर पाहिजे
६ वी गल्ली H.D.F.C. बँकेच्या समोरील गल्लीत
भेटण्याची वेळ दुपारी १२।। ते २
संध्या. ६।। ते ८

**विकणे आहे**
वलवाडी गोंदुर रोड दुकान फर्निचर पीओपीसह विकणे आहे. व भोकर शिवारात विमानतळ फाटा सर्व्हे नं.९/१/२ मधील प्लॉट विकणे आहे.
9011894666

**पाहिजेत**
• नर्स (ANM GNM)
• R.M.O
• रिसेप्शनिस्ट
• B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट
संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**गरम पाण्याचा एकच उपाय...**
BAJAJ Crompton Racold USHA




आजच खरेदी करा आणि मिळवा पाईप सोबत फिटिंग फ्री *...
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०